## मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती करणेबाबत.

## जाहिरात

वनसंरक्षक (प्रा.), धुळे यांचे अधिनस्त धुळे वन विभागातील धुळे जिल्ह्याकरीता वन्यजीव संरक्षणार्थ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 मधील कलम-4 (1) (बी) (बी) मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार शासनामार्फत मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती करावयाची आहे. नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडुन उपवनसंरक्षक (प्रा.), धुळे वनविभाग, धुळे यांचे कार्यालयाच्या Email ID - dcfdhule@gmail.com वर अर्ज सादर करुन त्याची हार्ड कॉपी त्वरीत कार्यालयाच्या पत्यावर पाठवावी.

अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावी.

1. ओळखपत्र
2. कायमचा पत्ता याबाबतचा पुरावा
3. वन्यजीव संरक्षण, संवर्धन, मानव-वन्यजीव संघर्ष तसेच निसर्गात संकटग्रस्त, नामशेष होत चाललेल्या प्रजातीचे संवर्धन, संरक्षण इ.बाबत केलेल्या कामाचा तपशील

वरील जाहीरातीच्या अनुषंगाने याद्वारा सुचित करण्यात येते की, वनसंरक्षण व वनसंवर्धनाचे काम करणाऱ्या तसेच मानव व वन्यजीव संघर्ष कमी करण्याचे काम करणाऱ्या उमेदवारांची/सेवाभावी संस्थांची वाढती संख्या विचारात घेवुन प्रत्येकाला वन्यजीव संरक्षणार्थ मानद वन्यजीव रक्षक म्हणुन काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी मानद वन्यजीव रक्षक या पदाकरिता वन्यजीव संरक्षणार्थ केलेल्या कामांसंदर्भात स्वतंत्र प्रस्तावासह अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| 1 | उपवनसंरक्षक (प्रा.), धुळे वनविभाग, धुळे Email ID - dcfdhule@gmail.com वर अर्ज स्विकारणे कालावधी | दिनांक 10 एप्रिल 2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत |
| 2 | प्राप्त अर्जांची छाननी करणे. | दिनांक 11 एप्रिल 2025 ते 15 एप्रिल 2025 |

टिप :

1. आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत वेळोवेळी https://mahaforest.gov.in/ या संकेतस्थळावर सुचना प्रसिध्द करण्यात येईल. अशा सुचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.
2. उमेदवाराने प्रस्ताव सादर करतांना ओळखपत्र व कायमचा पत्ता याबाबत पुरावे जोडणे बंधनकारक आहे.

प्रस्तुत जाहिरात ही संक्षिप्त जाहिरात असुन अर्ज स्विकारण्याची पध्दत, अर्हता, निवडीचा प्रक्रीया याबाबतचा सविस्तर तपशील https://mahaforest.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याचे कृपया अवलोकन करावे. उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसुन वरील संकेतस्थळावर आवश्यक माहिती वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

### अटी शर्ती

1. उमेदवारास वन्यजीव संवर्धनाची खरी काळजी असणे आवश्यक आहे
2. निसर्गाच्या आणि वन्यजीव संवर्धनाच्या हिताला हानी पोहोचवणाऱ्या कोणत्याही अपराधी कृत्यात सहभागी नसलेला व्यक्ती.
3. वन्यजीवांच्या व्यावसायीक शोषणात सहभागी असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा विचार केला जाणार नाही.
4. वन व वन्यजीव विभागाचे यंत्रणेला मदत करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.
5. स्थानिक समुदायाशी संवाद साधून त्यांना वन्यजीव संरक्षण व संवर्धनाचा संदेश पोहोचवण्यात सक्षम असणारी व्यक्ती.

मुख्य लेखापाल
उप वनसंरक्षक,धुळे वनविभाग
धुळे.

नितिनकुमार सिंग, (भा.व.से.)
**उपवनसंरक्षक (प्रादेशिक)**
**धुळे वनविभाग,धुळे.**